AC – 20/05/2025

**Item No. – 5.51 (N) (Sem III & IV)**

**(4) (a,b,c,d)**

# As Per NEP 2020

# University of Mumbai

## Syllabus for Marathi - Minor
## Vertical 2

| | | |
|---|---|---|
| **Faculty of Arts** | | |
| **Board of Studies in Marathi** | | |
| **Second Year Programme in Minor** | | |
| **Semester** | **III & IV** | |
| **Title of Paper** | **Sem.** | **Credits** |
| १) कथनात्म साहित्यप्रकाराचा अभ्यास : कथा व कादंबरी | **III** | **4** |
| २) इतिहास आणि साहित्य | **III** | **4** |
| **Title of Paper** | | **Credits** |
| १) ललित गद्य आणि रिपोर्ताज | **IV** | **4** |
| २) राजकारण आणि साहित्य | **IV** | **4** |
| **From the Academic Year** | | **2025-26** |

# Sem. - III

# Syllabus
# B.A. (Marathi - Minor)
# (Semester - III)

## Title of Paper : कथनात्म साहित्यप्रकाराचा अभ्यास : कथा व कादंबरी

| Sr. No. | Heading | Particulars |
|---|---|---|
| 1 | **अभ्यासक्रमाचे वर्णन**<br><br>(**Description of the Course**) **:** | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० नुसार कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखांमध्ये पदवीस्तरावर अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी मराठी विषयाच्या लघु अभ्यासक्रमांची (Minor Courses) किमान १८ श्रेयांकने (Credits) प्राप्त केली, तर त्या विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रमुख विषयाच्या पदवीसोबत **'मराठी लघु' (Marathi Minor)** ही पदवी प्राप्त होईल. तसेच ते विद्यार्थी मराठी विषयात पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेण्यास पात्र ठरतील.<br>लघु अभ्यासक्रमाचे (Minor Course) उपरोक्त स्वरूप लक्षात घेऊन उत्तरोत्तर विकसित (Progressive) होत जाणाऱ्या साहित्यकेंद्री अभ्यासपत्रिकांचे अध्ययन करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरून दुसऱ्या सत्रामध्ये 'साहित्यप्रकार : नाटक' या अभ्यासपत्रिकेची आखणी करण्यात आली होती. याच धोरणानुसार कला शाखेच्या बरोबरीने वाणिज्य आणि विज्ञान विद्याशाखांमध्ये **तिसऱ्या सत्रासाठी (M1, M1-M2, M1-M2-M3 या प्रारूपांतर्गत) मराठी लघु (Marathi Minor) विषयाची सलग निवड** करणाऱ्या विद्यार्थ्यांना साहित्यकेंद्री अभ्यासपत्रिका म्हणून **'कथनात्म साहित्यप्रकाराचा अभ्यास : कथा व कादंबरी' (श्रेयांकने ४)** या अभ्यासपत्रिकेचे अध्ययन करणे **अनिवार्य** आहे.<br>कथा व कादंबरी हे कथनात्म साहित्यप्रकार आहेत. त्यामुळे कथनात्म साहित्यप्रकाराचे घटक (आशयसूत्र, कथानक, घटना-प्रसंग, पात्र, निवेदक व निवेदन, स्थल-काल (वातावरण), भाषा) कथा आणि कादंबरी या दोन्ही साहित्यप्रकारांमध्ये उपस्थित असतात. असे असले तरी संबंधित साहित्यप्रकारांचे हेतू, स्वरूप आणि रचनातंत्र भिन्न असल्याने, या घटकांच्या स्वरूपविशेषांमध्ये आणि उपयोजनामध्ये काहीएक भिन्नता असते. विद्यार्थ्यांना कथनात्म साहित्य ही संकल्पना स्पष्ट व्हावी, तसेच कथा व कादंबरी या कथनात्म साहित्यप्रकारांमधील साम्य-भेदांचा परिचय व्हावा, ही या अभ्यासपत्रिकेमागील मुख्य उद्दिष्टे आहेत.<br>**'कथनात्म साहित्यप्रकाराचा अभ्यास: कथा व कादंबरी' (श्रेयांकने ४)** या अभ्यासपत्रिकेत एकूण चार घटक समाविष्ट करण्यात आले आहेत. पहिल्या घटकामध्ये 'कथनात्म साहित्य' ही संकल्पना आणि कथा व कादंबरी या कथनात्म साहित्यप्रकारांच्या घटकांचा परिचय करून देणे अभिप्रेत आहे. दुसऱ्या घटकात कथा व कादंबरी या कथनात्म |

| | | |
|---|---|---|
| | | साहित्यप्रकारांतील साम्य-भेदात्मक नाते आणि या साहित्यप्रकारांचे रचनादृष्ट्या केले जाणारे वर्गीकरण हे उपघटक अंतर्भूत आहेत.<br>तिसऱ्या घटकात मराठी कथा परंपरेतील विविध प्रवृत्ती आणि प्रवाह यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या निवडक पाच कथा संहिता समाविष्ट करण्यात आल्या आहेत. चौथ्या घटकामध्ये एक कादंबरी संहिता समाविष्ट आहे. |
| 2 | **Vertical :** | Minor |
| 3 | **Type :** | Theory |
| 4 | **Credit :** | 04 Credits (1 Credit = 15 Hours for Theory or 30 Hours of Practical Work in a Semester) |
| 5 | **Hours Allotted :** | 60 Hours |
| 6 | **Marks Allotted :** | 100 Marks |
| 7 | **अभ्यासक्रम उद्दिष्टे (Course Objectives) :**<br>१. कथा व कादंबरी या कथनात्म साहित्यप्रकारांची संकल्पना आणि स्वरूपवैशिष्ट्ये स्पष्ट करणे.<br>२. कथा व कादंबरी या कथनात्म साहित्यप्रकारांच्या विविध घटकांचा परिचय करून देणे.<br>३. कथा व कादंबरी या कथनात्म साहित्यप्रकारांमधील साम्य-भेदात्मक परस्परसंबंध उलगडून दाखविणे.<br>४. कथा व कादंबरी या कथनात्म साहित्यप्रकारांतील निवडक संहितांचे आशय आणि रचनादृष्ट्या आकलन व विश्लेषण करणे.<br>५.निवडक कथा व कादंबरी संहितांमधील कल्पित वास्तव आणि मूल्यदृष्टीचा परिचय करून देणे. | |
| 8 | **अभ्यासक्रम निष्पत्ती (Course Outcomes) :**<br>१. विद्यार्थ्यांना कथा व कादंबरी या कथनात्म साहित्यप्रकारांची संकल्पना आणि स्वरूपवैशिष्ट्ये स्पष्ट होतील.<br>२. विद्यार्थ्यांना कथा व कादंबरी या कथनात्म साहित्यप्रकारांच्या विविध घटकांचा परिचय होईल.<br>३. विद्यार्थ्यांना कथा व कादंबरी या कथनात्म साहित्यप्रकारांमधील साम्य-भेदात्मक परस्परसंबंध उलगडेल.<br>४. विद्यार्थ्यांमध्ये कथा व कादंबरी या साहित्यप्रकारांतील निवडक संहितांचे आशय आणि रचनादृष्ट्या आकलन व विश्लेषण करण्याची क्षमता विकसित होईल.<br>५.विद्यार्थ्यांना निवडक कथा व कादंबरी संहितांमधील कल्पित वास्तव आणि मूल्यदृष्टीचा परिचय होईल. | |
| 9 | **अभ्यासक्रम घटक (Modules) :** | |
| | **घटक - १ : कथनात्म साहित्यप्रकारांचा तात्त्विक परिचय : कथा व कादंबरी** (**भाग - १**) | |
| | अ) कथा व कादंबरी या कथनात्म साहित्यप्रकारांची संकल्पना आणि स्वरूपविशेष<br>आ) कथा व कादंबरी या कथनात्म साहित्यप्रकारांचे घटक : आशयसूत्र, कथानक, घटना-प्रसंग, पात्र, निवेदक व निवेदन, स्थल- काल (वातावरण), भाषा<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका, श्रेयांकन १) | |

| | |
|---|---|
| | **घटक - २ : कथनात्म साहित्यप्रकारांचा तात्त्विक परिचय : कथा व कादंबरी (भाग - २)** |
| | अ) कथा व कादंबरी या कथनात्म साहित्यप्रकारांचा साम्य-भेदात्मक परस्परसंबंध<br>आ) कथनात्म साहित्यप्रकारांचे रचनादृष्ट्या वर्गीकरण :<br>१. कथा : लघुकथा, दीर्घकथा, मालिका कथा<br>२. कादंबरी : लघुकादंबरी (कादंबरिका), बृहद् कादंबरी, कादंबरी मालिका (कादंबरीद्वय, कादंबरीत्रय, कादंबरीचतुष्टय)<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका, श्रेयांकन १) |
| | **घटक - ३ : निवडक पाच कथा संहितांचा अभ्यास** |
| | १. जानकी देसाईचे प्रश्न : विजया राजाध्यक्ष<br>२. पड : अमिताभ<br>३. वनवास : प्रकाश नारायण संत<br>४. ओझं : आसाराम लोमटे<br>५. चोपी : विवेक कुडू<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका, श्रेयांकन १) |
| | **घटक - ४ : कादंबरी संहितेचा अभ्यास** |
| | जुगाड : किरण गुरव<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका, श्रेयांकन १) |
| **10** | **पाठ्य ग्रंथ (Text Books) :**<br>**कथा**<br>१. 'जानकी देसाईचे प्रश्न', विजया राजाध्यक्ष, *वेचक : विजया राजाध्यक्ष,* (निवड - समीक्षा शांता शेळके), सन पब्लिकेशन, १९९०.<br>२. 'पड', अमिताभ, *पड,* अभिनव प्रकाशन, मुंबई, १९८०.<br>३. 'वनवास', प्रकाश नारायण संत, *वनवास,* मौज प्रकाशन गृह, मुंबई, १९९५.<br>४. 'ओझं', आसाराम लोमटे, *आलोक,* शब्द पब्लिकेशन, मुंबई, २०१०.<br>५. 'चोपी', विवेक कुडू, *चार चपटे मासे,* शब्द पब्लिकेशन, मुंबई, २०२२.<br>**कादंबरी**<br>*जुगाड*, किरण गुरव, दर्या प्रकाशन, पुणे, २०१८. |

**11**

**संदर्भ ग्रंथ (Reference Books) :**

**मराठी :**


१. *वाङ्‌मयीन संज्ञा-संकल्पना कोश*, (संपा.) प्रभा गणोरकर आणि इतर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २००१.
२. *मराठी वाङ्‌मयकोश - खंड ४ (समीक्षा-संज्ञा)*, (समन्वयक संपा.) विजया राजाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, २००२.
३. *संक्षिप्त मराठी* वाङ्‌मयकोश *- (१९२० पासून २००३ पर्यंतचा कालखंड)*, (संपा.) प्रभा गणोरकर आणि इतर, जी. आर. भटकळ फाउंडेशन, मुंबई, २००४.
४. *कादंबरीविषयी*, हरिश्चंद्र थोरात, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००६.
५. *कादंबरीः एक साहित्यप्रकार*, हरिश्चंद्र थोरात, शब्द पब्लिकेशन, मुंबई, २०१०.
६. *कथनात्म साहित्य आणि समीक्षा*, हरिश्चंद्र थोरात, शब्द पब्लिकेशन, मुंबई, २०११.
७. *मराठी कादंबरी पैस आणि परीघ*, नीतीन रिंढे, शब्द पब्लिकेशन, मुंबई, २०२१.
८. *प्रदक्षिणा : खंड १ व २*, (संपा.) अनिरूद्ध कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७२.
९. *मराठी कादंबरी : तंत्र आणि विकास*, प्र. वा. बापट व वा. ना. गोडबोले, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९७३.
१०. *मराठी कादंबरीचे पहिले शतक १८५० ते १९५०*, कुसुमावती देशपांडे, मुंबई मराठी साहित्य संघ प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती - १९७५.
११. *धार आणि काठ,* नरहर कुरुंदकर, देशमुख आणि कंपनी, पुणे, १९७१.
१२. *कादंबरी आणि मराठी कादंबरी,* उषा हस्तक, साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, १९९३.
१३. *कथा : संकल्पना आणि समीक्षा*, सुधा जोशी, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ व मौज प्रकाशन गृह, मुंबई, २०००.
१४. *ग्रामीण कथा स्वरूप आणि विकास*, वासुदेव मुलाटे, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, १९९२.
१५. *१९८०नंतरचे स्त्री-निर्मित कथनपर साहित्य*, (संपा.) पुष्पलता राजापुरे-तापस, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०१०.
१६. *मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप*, (संपा.) गो. मा. पवार व म. द. हातकणंगलेकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८६.
१७. *मराठी लघुकथेचा इतिहास*, म. ना.अदवंत, निहारा प्रकाशन, पुणे, २००८.
१८. *मराठी कथा उद्गम आणि विकास*, इंदुमती शेवडे, सोमैय्या प्रकाशन, मुंबई, १९७२.
१९. *लघुकथालेखन : मंत्र आणि तंत्र,* ना.सी. फडके, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९९२.
२०. 'मराठी नवकादंबरी', *अक्षरांचा श्रम केला*, विलास सारंग, मौज प्रकाशन गृह, मुंबई, २०००.
२१. *ललित,* कथा विशेषांक, ऑगस्ट २०१३.
२२. 'कथनमीमांसा', गंगाधर पाटील, *अनुष्टुभ्*, दिवाळी अंक, १९९१.
२३. 'कथात्म अवकाश आणि प्रदेश', गंगाधर पाटील, *अनुष्टुभ्*, मे-जून १९९१.


**English**:


1. *Theory of the novel*, George Lukas, (Tr.) Edith Bone,London, Reprint,1978.
2. *Rise of Novel*, Ian watt, Penguin, Harmondsworth, 1963.
3. *The Dialogic Imagination*, Mikhail Bakhtin (Edited by) Michael Holquist, (Tr.) Caryl Emerson and Michael Holquist, University of Texas Press, Austin,1994.
4. *Narrative Discourse*, Gerard Genette, (Tr.) Jane E. Lekin, Basil Blackwell, Oxford, 1980.

| | | |
|---|---|---|
| 12 | **Internal Continuous Assessment : 40%** | **External, Semester End Examination : 60%**<br>**Individual Passing in Internal and External Examination** |
| 13 | **अंतर्गत सातत्यपूर्ण मूल्यांकन (Internal Continuous Assessment) : ४० गुण**<br>**अंतर्गत मूल्यांकनाचे स्वरूप (Format of Internal Assessment) :**<br>चाचणी परीक्षा / मौखिक परीक्षा / प्रकल्पलेखन / नियतकार्य (Assignment) / सादरीकरण / प्रश्नमंजूषा यांपैकी कोणत्याही पद्धतींचा अवलंब करून अंतर्गत मूल्यमापन करता येईल.<br>(प्रत्यक्ष उपस्थिती किंवा ऑनलाईन) | **बहिर्गत परीक्षा (External Examination) : ६० गुण (वेळ : दोन तास)**<br>**बहिर्गत परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप (Format of Question Paper) :**<br>१. प्रत्येकी १५ गुणांचे **सहा** प्रश्न द्यावेत. विद्यार्थ्यांनी **चार** प्रश्नांची उत्तरे लिहावीत. पहिल्या **पाच प्रश्नांपैकी कोणत्याही तीन** प्रश्नांची उत्तरे लिहिणे आवश्यक आहे. **सहावा** प्रश्न सोडविणे **अनिवार्य** आहे.<br>२. पहिले **चार** प्रश्न हे प्रत्येक घटकावर आधारलेले दीर्घोत्तरी स्वरूपाचे व अंतर्गत पर्याय देणारे असावेत.<br>३. प्रश्न क्रमांक **पाच** हा सर्व घटकांवर आधारित टिपांचा असावा. **चार**पैकी कोणत्याही **दोन** टिपा लिहाव्यात.<br>४. प्रश्न क्रमांक **सहा** हा **अनिवार्य** असून तो सर्व घटकांवर आधारित वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असावा. या प्रश्नामध्ये प्रत्येक घटकावर **पाच** प्रश्न विचारावेत. विद्यार्थ्यांनी एकूण **वीस** वस्तुनिष्ठ प्रश्नांपैकी कोणत्याही **पंधरा** प्रश्नांची उत्तरे लिहावीत. |

# Syllabus
# B.A. (Marathi - Minor)
# (Semester - III)

## Title of Paper : इतिहास आणि साहित्य

| Sr. No. | Heading | Particulars |
|---|---|---|
| 1 | **अभ्यासक्रमाचे स्वरूप**<br>**(Description of the Course) :** | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० नुसार **M1, M1-M2 व M1-M2-M3 या प्रारूपांतर्गत तिसऱ्या** सत्रासाठी **लघु अभ्यासक्रम (Minor Course)** म्हणून **'इतिहास आणि साहित्य'** ही अभ्यासपत्रिका अध्ययनासाठी उपलब्ध आहे. मराठी मुख्य (Marathi Major) हा विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांना या अभ्यासपत्रिकेची निवड करता येणार नाही .**फक्त एका सत्रासाठी (सत्र - तीन) मराठी लघु (Marathi Minor)** अभ्यासक्रमाचे अध्ययन करू इच्छिणारे कला शाखेतील सामाजिक शास्त्राचे विद्यार्थी, तसेच वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थी **'इतिहास आणि साहित्य (श्रेयांकने ४)** या अभ्यासपत्रिकेची निवड करू शकतात .<br>मानवी जीवनाचा शोध घेण्यासाठी मानवाने निर्माण केलेल्या विधांपैकी सामाजिक शास्त्रे आणि कला या दोन विधा होत. या दोन्ही विधांचा दृष्टिकोन, शोध घेण्याची पद्धती आणि आविष्कार पद्धती या भिन्न असल्या तरी त्यांचे अंतिम ध्येय एकच असते, असे म्हणता येईल .या दोन विधांमध्ये परस्परसंबंधही आहेत .<br>इतिहास हे एक सामाजिक शास्त्र आहे, तर साहित्य ही भाषिक कला आहे. या दोन भिन्न ज्ञानशाखा आहेत. त्यांची स्वत:ची खास स्वरूपवैशिष्ट्ये आहेत; पण त्याचबरोबर त्यांच्यात काही साम्यस्थळे, संयोगस्थळेही आहेत, म्हणूनच इतिहास आणि साहित्य हे परस्परांवर प्रभाव टाकताना दिसातात. काही इतिहासग्रंथांमध्येवा ङ्मयीन गुण प्रकटतात, तर काही साहित्यकृती इतिहासाचा वेगवेगळ्या पातळ्यांवर उपयोग करून निर्माण झालेल्या दिसतात .<br>प्रस्तुत अभ्यासपत्रिकेत या सर्व अंगांनी इतिहास आणि साहित्य यांच्यातील परस्पर संबंधांचा अभ्यास करणे अभिप्रेत आहे. |
| 2 | **Vertical :** | Minor |
| 3 | **Type :** | Theory |
| 4 | **Credit :** | 04 Credits (1 Credit = 15 Hours for Theory or 30 Hours of Practical Work in a Semester) |
| 5 | **Hours Allotted :** | 60 Hours |
| 6 | **Marks Allotted :** | 100 Marks |

| | |
|---|---|
| **7** | **अभ्यासक्रम उद्दिष्टे (Course Objectives) :**<br>१. सामाजिक शास्त्रे व कला यांच्यातील साम्य-भेदांचे आकलन करून देणे.<br>२. इतिहासशास्त्र व साहित्य या दोहोंची स्वरूपवैशिष्ट्ये स्पष्ट करणे.<br>३. इतिहास व साहित्य यांच्यातील परस्परसंबंधांचा परिचय करून देणे.<br>४. प्रत्यक्ष साहित्यकृतींच्या आकलनाच्या आधारे इतिहासग्रंथांमधील वाङ्मयीन गुण व साहित्यकृतींमधील ऐतिहासिक घटक यांचा अभ्यास करणे. |
| **8** | **अभ्यासक्रम निष्पत्ती (Course Outcomes) :**<br>१. विद्यार्थ्यांना सामाजिक शास्त्रे व कला यांच्यातील साम्य-भेदांचे आकलन होईल.<br>२. विद्यार्थ्यांना मानवी जीवनाचे अर्थनिर्णयन करणारे भिन्न भाषिक आविष्कार म्हणून इतिहासशास्त्र आणि साहित्य या संकल्पना व त्यांची स्वरूपवैशिष्ट्ये स्पष्ट होतील.<br>३. विद्यार्थ्यांना इतिहास व साहित्य यांच्यातील परस्परसंबंधांचा परिचय होईल.<br>४. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष साहित्यकृतींच्या आकलनाच्या आधारे इतिहासग्रंथांमधील वाङ्मयीन गुण व साहित्यकृतींमधील ऐतिहासिक लेखनाचे घटक यांचे आकलन होईल. |
| **9** | **अभ्यास घटक (Modules) :** |
| | **घटक - १ : इतिहास व साहित्य : संकल्पना व स्वरूपवैशिष्ट्ये** |
| | अ) १. इतिहास : एक सामाजिक शास्त्र<br>२. इतिहासाची स्वरूपवैशिष्ट्ये : वस्तुनिष्ठता, ऐतिहासिक दृष्टिकोन, विश्लेषण व मीमांसा, व्यक्तिविशिष्ट दृष्टिकोन, विविध शोधपद्धती, कथनपरता<br>आ) १. साहित्य : एक भाषिक कला<br>२. साहित्याची स्वरूपवैशिष्ट्ये : आत्मनिष्ठता, कल्पनाप्रधानता, भाषिक रचना, वास्तवाभिमुखता, कथनपरता<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका, श्रेयांकन - १) |
| | **घटक - २ : इतिहास व साहित्य : परस्परसंबंध** |
| | अ) इतिहासलेखनाची वाङ्मयीन अंगे : घटितांचा अन्वयार्थ लावण्यामागची मर्यादित कल्पनाशीलता, व्यक्तिविशिष्ट दृष्टिकोनामुळे येणारी सापेक्षता, कथनात्मता, स्मृतिपर लेखन, बखरपर गद्य यांची वाङ्मयीन वैशिष्ट्ये<br>आ) वाङ्मयातील इतिहासदर्शन : वास्तवाभिमुखतेतील ऐतिहासिक अंश, ऐतिहासिक कादंबरी, ऐतिहासिक नाटक यांतील इतिहासाचा विविधांगी उपयोग<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका, श्रेयांकन - १) |
| | **घटक - ३ : इतिहासपर गद्याचा अभ्यास : बखर** |
| | कृष्णाजी अनंत सभासद विरचित 'शिवछत्रपतींचे चरित्र' (सभासदाची बखर) : संपादक - र. विहेरवाडकर .<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका, श्रेयांकन -१) |
| | **घटक - ४ : इतिहासपर साहित्यकृतीचा अभ्यास : कादंबरी** |
| | श्रीमंत गोपिकाबाईंची बखर : आनंद विनायक जातेगावकर<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका, श्रेयांकन -१) |

| | | |
|---|---|---|
| 10 | **पाठ्य ग्रंथ (Text Books) :**<br>१. हेरवाडकर, र. वि. (संपा.) ,*कृष्णाजी अनंत सभासद विरचित 'शिवछत्रपतींचे चरित्र' ( सभासदाची बखर), व्हीनस प्रकाशन, १९८६*<br>२. आनंद विनायक जातेगावकर, *श्रीमंत गोपिकाबाईंची बखर, राजा प्रकाशन, मुंबई २००४* | |
| 11 | **संदर्भ ग्रंथ (Reference Books) :**<br>१. कार ई. एच्. (१९८३) : *इतिहास म्हणजे काय?*, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.<br>२. साने ह. श्री. (१९९५) : *सामाजिक शास्त्रे आणि साहित्य : अंतःसंबंध*, प्रतिमा प्रकाशन, पुणे.<br>३. सेतुमाधवराव पगडी (१९८८) : *इतिहास आणि कल्पित*, परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई.<br>४. राजा दीक्षित (१९९३) : *इतिहास, समाजविचार आणि केशवसुत*, लोकवाङ्मय गृह, मुंबई.<br>५. जाधव रा. ग. (२००६) : 'साहित्य आणि इतिहास', (समाविष्ट) *निवडक समीक्षा*, पद्मगंधा प्रकाशन, पुणे<br>६. अनिरुद्ध देशपांडे (२०१०) : 'इतिहासलेखन की इतिहासचित्रण - इतिहासकारापुढील दुविधा', (समाविष्ट), *इतिहासलेखन मीमांसा*, लोकवाङ्मय गृह, मुंबई | |
| 12 | **Internal Continuous Assessment: 40%** | **External, Semester End Examination : 60%**<br>**Individual Passing in Internal and External Examination :** |
| 13 | **अंतर्गत सातत्यपूर्ण मूल्यांकन )Internal Continuous Assessment : (४० गुण**<br>**अंतर्गत मूल्यांकनाचे स्वरूप )Format of Internal Assessment) :**<br>चाचणी परीक्षा / प्रकल्पलेखन / मौखिक परीक्षा / ) नियतकार्यAssignment / सादरीकरण / ( प्रश्नमंजूषा यांपैकी कोणत्याही पद्धतींचा अवलंब करून अंतर्गत मूल्यमापन करतायेईल.<br>(प्रत्यक्ष उपस्थिती किंवा ऑनलाईन) | **बहिर्गत परीक्षा )External Examination : (६० गुण (वेळ दोन : तास)**<br>**बहिर्गत परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप ) Format of Question Paper (:**<br>५. प्रत्येकी १५ गुणांचे **सहा** प्रश्न द्यावेत विद्यार्थ्यांनी .**चार** प्रश्नांची उत्तरे लिहावीत पहिल्या .**पाच** प्रश्नांपैकी कोणत्याही **तीन** प्रश्नांची उत्तरे लिहिणे आवश्यक आहे .**सहावा** प्रश्न सोडविणे **अनिवार्य** आहे .<br>६. पहिले **चार** प्रश्न हे प्रत्येक घटकावर आधारलेले दीर्घोत्तरी स्वरूपाचे व अंतर्गत पर्याय देणारे असावेत.<br>७. प्रश्न क्रमांक **पाच** हा सर्व घटकांवर आधारित टिपांचा असावा .**चार**पैकी कोणत्याही **दोन** टिपा लिहाव्यात.<br>१. प्रश्न क्रमांक **सहा** हा **अनिवार्य** असून तो सर्व घटकांवर आधारित वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असावाया प्रश्नामध्ये प्रत्येक . घटकावर **पाच** प्रश्न विचारावेत. विद्यार्थ्यांनी एकूण **वीस** वस्तुनिष्ठ प्रश्नांपैकी कोणत्याही **पंधरा** प्रश्नांची उत्तरे लिहावीत. |

# Sem. - IV

**Syllabus**
**B.A. (Marathi - Minor)**
**(Semester - IV)**

**Title of Paper : ललित गद्य आणि रिपोर्ताज**

| Sr. No. | Heading | Particulars |
|---|---|---|
| 1 | **अभ्यासक्रमाचे स्वरूप (Description of the Course):** | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० नुसार कला, वाणिज्य व विज्ञान विद्याशाखांमध्ये पदवीस्तरावर अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी मराठी विषयाच्या लघु अभ्यासक्रमांची (Minor Courses) किमान १८ श्रेयांकने (Credits) प्राप्त केली, तर त्या विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रमुख विषयाच्या पदवीसोबत **'मराठी लघु' (Marathi Minor)** ही पदवी प्राप्त होईल. तसेच ते विद्यार्थी मराठी विषयात पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेण्यास पात्र ठरतील.<br>लघु अभ्यासक्रमाचे (Minor Course) उपरोक्त स्वरूप लक्षात घेऊन उत्तरोत्तर विकसित (Progressive) होत जाणाऱ्या साहित्यकेंद्री अभ्यासपत्रिकांचे अध्ययन करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरून दुसऱ्या व तिसऱ्या सत्रांमध्ये अनुक्रमे 'साहित्यप्रकार : नाटक' आणि 'कथनात्म साहित्यप्रकाराचा अभ्यास : कथा व कादंबरी' या अभ्यासपत्रिकांची आखणी करण्यात आली होती. याच धोरणानुसार कला शाखेच्या बरोबरीने वाणिज्य आणि विज्ञान विद्याशाखांमध्ये **चौथ्या सत्रासाठी (M1, M1-M2, M1-M2-M3 या प्रारूपांतर्गत) मराठी लघु (Marathi Minor) विषयाची सलग निवड** करणाऱ्या विद्यार्थ्यांना साहित्यकेंद्री अभ्यासपत्रिका म्हणून **'ललित गद्य आणि रिपोर्ताज' (श्रेयांकने ४)** या अभ्यासपत्रिकेचे अध्ययन करणे **अनिवार्य** आहे.<br>या अभ्यासपत्रिकेत एकूण चार घटक समाविष्ट करण्यात आले आहेत. पहिल्या घटकात ललित गद्य या साहित्यप्रकाराची संकल्पना, घटक, प्रकार व ललित गद्याची वैशिष्ट्ये इत्यादींचे अध्ययन करणे अभिप्रेत आहे. दुसऱ्या घटकामध्ये निवडक ललित गद्यपर लेखांचा समावेश करण्यात आला आहे. तिसऱ्या घटकात रिपोर्ताज या साहित्यप्रकाराची संकल्पना, स्वरूपविशेष, निर्मितीप्रेरणा आणि मराठी रिपोर्ताजमधील आशयविश्व व कथनपद्धती इत्यादींचे अध्ययन करणे अभिप्रेत आहे. चौथ्या घटकामध्ये रिपोर्ताज या साहित्यप्रकारातील संहिता अध्ययनासाठी समाविष्ट करण्यात आली आहे. ललित गद्य व रिपोर्ताज या साहित्यप्रकारांच्या स्वरूपविशेषांचे व वेगळेपणाचे भान विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावे, तसेच विद्यार्थ्यांना या साहित्यप्रकारांतील संहितांचे अध्ययन करता यावे, ही उद्दिष्टे समोर ठेवून प्रस्तुत अभ्यासपत्रिकेची आखणी करण्यात आली आहे. |
| 2 | **Vertical :** | Minor |
| 3 | **Type :** | Theory |
| 4 | **Credit :** | 04 Credits (1 Credit = 15 Hours for Theory or 30 Hours of Practical Work in a Semester) |

| | | |
|---|---|---|
| 5 | **Hours Allotted :** | 60 Hours |
| 6 | **Marks Allotted :** | 100 Marks |
| 7 | **अभ्यासक्रम उद्दिष्टे (Course Objectives) :**<br>१. ललित गद्य व रिपोर्ताज या साहित्यप्रकारांची संकल्पना स्पष्ट करणे.<br>२. ललित गद्य व रिपोर्ताज या साहित्यप्रकारांच्या स्वरूपवैशिष्ट्यांचा परिचय करून देणे.<br>३. ललित गद्य व रिपोर्ताज या साहित्यप्रकारांतील संहितांचे आशय आणि रचनादृष्ट्या आकलन व विश्लेषण करणे.<br>४. ललित गद्य व रिपोर्ताज या साहित्यप्रकारांतील कल्पनाविश्व, वास्तव आणि मूल्यदृष्टीचा परिचय करून देणे. | |
| 8 | **अभ्यासक्रम निष्पत्ती (Course Outcomes) :**<br>१. विद्यार्थ्यांना ललित गद्य व रिपोर्ताज या साहित्यप्रकारांची संकल्पना स्पष्ट होईल.<br>२. विद्यार्थ्यांना ललित गद्य व रिपोर्ताज या साहित्यप्रकारांच्या स्वरूपवैशिष्ट्यांचा परिचय होईल.<br>३. विद्यार्थ्यांना ललित गद्य व रिपोर्ताज या साहित्यप्रकारांतील संहितांचे आशय आणि रचनादृष्ट्या आकलन व विश्लेषण करता येईल.<br>४. विद्यार्थ्यांना ललित गद्य व रिपोर्ताज या साहित्यप्रकारांतील कल्पनाविश्व, वास्तव आणि मूल्यदृष्टीचा परिचय होईल. | |
| 9 | **अभ्यास घटक (Modules) :** | |
| | **घटक - १ : ललित गद्य या** साहित्यप्रकारा**चा तात्त्विक परिचय** | |
| | अ) १. ललित गद्य या साहित्यप्रकाराची संकल्पना<br>२. ललित गद्याचे घटक : 'मी'त्वाचा प्रदेश, विषयवस्तूचा प्रदेश, अनुभवविश्व, भाषा<br>आ) १. ललित गद्याचे प्रकार : लघुनिबंध, व्यक्तिचित्रणे, स्मरणपर निबंध, आठवणी, अनुभव, प्रवासवर्णन<br>२. ललित गद्याची वैशिष्ट्ये<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका, श्रेयांकन - १) | |
| | **घटक - २ : निवडक ललित गद्यपर लेखांचा अभ्यास** | |
| | ऋणानुबंध : यशवंतराव चव्हाण ('ऋणानुबंध' या ललित गद्यपर साहित्यकृतीतील निवडक १० लेख)<br>१. सोनहिरा<br>२. कुलसुम दादी<br>३. काही छंद : काही श्रद्धा<br>४. स्वातंत्र्य आंदोलन<br>५. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचे काही पूर्वक्षण<br>६. महात्माजी व महाराष्ट्र<br>७. पुण्यवंत नीतिवंत जाणता राजा<br>८. मराठीचे सर्वसंग्राहक स्वरूप<br>९. साहित्य आणि प्रबोधन<br>१०. चरित्रे आणि आत्मचरित्रे<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका, श्रेयांकन - १) | |
| | घटक - **३ : रिपोर्ताज या साहित्यप्रकाराचा तात्त्विक परिचय** | |
| | अ) रिपोर्ताज या साहित्यप्रकाराची संकल्पना, स्वरूपविशेष व निर्मितीप्रेरणा | |

| | | |
|---|---|---|
| | १. रिपोर्ताजची संकल्पना व स्वरूपविशेष **:** बातमी, वृत्तलेख या पत्रकारितेच्या क्षेत्रातील व ललितगद्य, प्रवासवर्णन, आत्मकथन इत्यादी साहित्याच्या क्षेत्रातील लेखनप्रकारांशी जोडलेले साम्य-भेदाचे संबंध, वस्तुनिष्ठ व व्यक्तिनिष्ठ अनुभवांचे मिश्रण<br>२. निर्मिती प्रेरणा **:** पत्रकारितेतील बदल, कार्यकर्ता पत्रकार, नव्या वाचकांच्या गरजा, युवकांच्या चळवळी, दळणवळणाच्या साधनांचा विकास, मध्यमवर्गीय चौकटीबाहेरच्या जगाविषयीचे कुतूहल, हस्तक्षेपाची इच्छा<br>आ) मराठी रिपोर्ताजमधील आशयविश्व आणि कथनपद्धती<br>१. आशयविश्व **:** सामाजिक समस्यांनी ग्रासलेले वास्तव, समूहदर्शन, समाजदर्शन, मूल्यसंघर्ष, कथनकर्त्याचा दृष्टिकोण व समस्येचे आकलन, विचारप्रणाली<br>२. कथन पद्धती **:** रिपोर्टर कथकाचा (निवेदक) दृष्टिकोण, घटनाक्रमांची हाताळणी व ठळक रूपबंध, भाषा, सादरीकरण पद्धती, रिपोर्ताजची आवाहकता<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका**,** श्रेयांकन -१) | |
| | घटक **- ४ : रिपोर्ताज या साहित्यप्रकारातील संहितेचा अभ्यास** | |
| | राबून निर्मिती घडवणाऱ्या पोलादी बाया : दिपा पवार<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका**,** श्रेयांकन -१) | |
| **10** | **पाठ्य ग्रंथ (Text Books) :**<br>१. *ऋणानुबंध,* यशवंतराव चव्हाण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, ई बुक आवृत्ती - २००६.<br>किंवा<br>*ऋणानुबंध,* यशवंतराव चव्हाण, रोहन प्रकाशन, पुणे, २०१३.<br>२. *राबून निर्मिती घडवणाऱ्या पोलादी बाया*, दिपा पवार, हरिती पब्लिकेशन्स, पुणे, २०२३. | |
| **11** | **संदर्भ ग्रंथ (Reference Books) :**<br>१. *ललित गद्याचे तात्त्विक स्वरूप आणि मराठी लघुनिबंधाचा इतिहास*, आनंद यादव, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९५.<br>२. *लघुनिबंध ते मुक्तगद्य*, वि. शं. चौघुले, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, २००२.<br>३. *ललित गद्य लेखन : स्वरूप, आकलन आणि वाटचाल*, रंजना कदम, Pustakmarket.com, ई बुक आवृत्ती, जानेवारी २०२१.<br>४. 'ललित गद्य', चंद्रशेखर जहागीरदार, *साहित्य : अध्यापन आणि प्रकार*, (संपा.) श्री. पु. भागवत व अन्य, पॉप्युलर प्रकाशन व मौज प्रकाशन, मुंबई, १९८७.<br>५. 'संकीर्ण ललित गद्य', गो. म. कुलकर्णी, *महाराष्ट्र साहित्य पत्रिका*, जानेवारी-मार्च १९६०.<br>६. '१९६० ते १९८५ मधील ललित गद्य', शांता शेळके, *ललित*, मुंबई, ऑगस्ट १९८८. | |
| **12** | **Internal Continuous Assessment : 40%** | **External, Semester End Examination : 60%**<br>**Individual Passing in Internal and External Examination** |
| **13** | **अंतर्गत सातत्यपूर्ण मूल्यांकन (Internal Continuous Assessment) : ४० गुण**<br>**अंतर्गत मूल्यांकनाचे स्वरूप (Format of Internal Assessment) :**<br><br>चाचणी परीक्षा / मौखिक परीक्षा / प्रकल्पलेखन / | **बहिर्गत परीक्षा (External Examination) : ६० गुण (वेळ : दोन तास)**<br>**बहिर्गत परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप (Format of Question Paper) :** |

| | | |
|---|---|---|
| | नियतकार्य (Assignment) / सादरीकरण / प्रश्नमंजूषा यांपैकी कोणत्याही पद्धतींचा अवलंब करून अंतर्गत मूल्यमापन करता येईल.<br>(प्रत्यक्ष उपस्थिती किंवा ऑनलाईन) | १. प्रत्येकी १५ गुणांचे **सहा** प्रश्न विचारावेत. विद्यार्थ्यांनी **चार** प्रश्नांची उत्तरे लिहावीत. पहिल्या **पाच प्रश्नांपैकी कोणत्याही तीन** प्रश्नांची उत्तरे लिहिणे आवश्यक आहे. **सहावा** प्रश्न सोडविणे **अनिवार्य** आहे.<br>२. पहिले **चार** प्रश्न हे प्रत्येक घटकावर आधारलेले दीर्घोत्तरी स्वरूपाचे व अंतर्गत पर्याय देणारे असावेत.<br>३. प्रश्न क्रमांक **पाच** हा सर्व घटकांवर आधारित टिपांचा असावा. **चार**पैकी कोणत्याही **दोन** टिपा लिहाव्यात.<br>४. प्रश्न क्रमांक **सहा** हा **अनिवार्य** असून तो सर्व घटकांवर आधारित वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असावा. या प्रश्नामध्ये प्रत्येक घटकावर **पाच** प्रश्न विचारावेत. विद्यार्थ्यांनी एकूण **वीस** वस्तुनिष्ठ प्रश्नांपैकी कोणत्याही **पंधरा** प्रश्नांची उत्तरे लिहावीत. |

**Syllabus**
**B.A. (Marathi - Minor)**
**(Semester - IV)**

**Title of Paper : राजकारण आणि साहित्य**

| S. N. | Heading | Particulars |
|---|---|---|
| 1 | **अभ्यासक्रमाचे वर्णन :** **Description of the Course :** | राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० नुसार **M1, M1-M2 व M1-M2-M3 या प्रारूपांतर्गत चौथ्या** सत्रामध्ये **मराठी लघु (Marathi Minor)** या विषयाची अध्ययनासाठी निवड करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी **'राजकारण आणि साहित्य' (श्रेयांकने - ४)** या अभ्यासपत्रिकेची आखणी करण्यात आली आहे. मराठी मुख्य (Marathi Major) हा विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांना या अभ्यासपत्रिकेची अध्ययनासाठी निवड करता येणार नाही. **केवळ एका सत्रासाठी (सत्र - चार) मराठी लघु (Marathi Minor)** अभ्यासक्रमाचे अध्ययन करू इच्छिणारे कला शाखेतील सामाजिक शास्त्राचे विद्यार्थी, तसेच वाणिज्य व विज्ञान विद्याशाखांमधील विद्यार्थी **'राजकारण आणि साहित्य' (श्रेयांकने ४)** या अभ्यासपत्रिकेचे अध्ययन करू शकतील.<br>कला आणि सामाजिक शास्त्रे या दोन विधा मानवी जीवनाचा विविधांगी शोध घेताना दिसतात. इतिहास, भाषा, धर्म, राजकारण यांचा साहित्यकलेशी घनिष्ट संबंध असतो. त्यामुळे त्यांच्यातील परस्पर अनुबंध समजून घेणे आवश्यक ठरते.<br>राजकारण आणि साहित्य ही एकमेकांना प्रभावित करणारी दोन महत्त्वाची क्षेत्रे आहेत. राजकारण आणि साहित्य या दोहोंना विचारसरणी व भूमिकांचे अधिष्ठान असते. साहित्याचा आविष्कार भाषिक कृतीच्या रूपाने होतो, तर राजकारणामध्ये समाजाच्या सर्व क्षेत्रांतील प्रत्यक्ष राजकीय व्यवहार अभिप्रेत असतात. साहित्यातील राजकीय विचारसरणींचा अभ्यास करणे, साहित्यावर राजकारण व राजकीय घटनांचा असलेला प्रभाव समजून घेणे, तसेच मराठी साहित्यकृतींमधील राजकीय आशय समजून घेणे, ही उद्दिष्टे समोर ठेवून प्रस्तुत अभ्यासपत्रिकेची रचना करण्यात आली आहे. |
| 2 | **Vertical :** | Minor |
| 3 | **Type :** | Theory |
| 4 | **Credit :** | 4 Credits (1 Credit = 15 Hours for Theory or 30 Hours of Practical Work in a Semester) |
| 5 | **Hours Allotted :** | 60 Hours |
| 6 | **Marks Allotted :** | 100 Marks |

| | |
|---|---|
| **7** | **अभ्यासक्रम उद्दिष्टे (Course Objectives) :**<br>१. राजकारण व राजकीय संकल्पनांचे आकलन करून देणे.<br>२. राजकारण आणि साहित्य यांचा परस्पर अनुबंध समजावून सांगणे.<br>३. साहित्यातून व्यक्त होणारी विचारसरणी (Ideology) व त्यासंबंधीच्या राजकारणाचा परिचय करून देणे.<br>४. निवडक नाट्य व कादंबरी संहितांमधून व्यक्त होणाऱ्या राजकारणाचे स्वरूप स्पष्ट करणे. |
| **8** | **अभ्यासक्रम निष्पत्ती (Course Outcomes) :**<br>१. विद्यार्थ्यांना राजकारण व राजकीय संकल्पनांचे आकलन होईल.<br>२. विद्यार्थ्यांना राजकारण आणि साहित्य यांचा परस्पर अनुबंध समजेल.<br>३. विद्यार्थ्यांना साहित्यातून व्यक्त होणारी विचारसरणी (Ideology) व त्यासंबंधीच्या राजकारणाचा परिचय होईल.<br>४. विद्यार्थ्यांना निवडक नाट्य व कादंबरी संहितांमधून व्यक्त होणाऱ्या राजकारणाचे स्वरूप स्पष्ट होईल. |
| **9** | **अभ्यासक्रम घटक (Modules) :** |
| | **घटक १ : राजकारण आणि राजकीय संकल्पना** |
| | अ) राजकारण : संकल्पना व स्वरूप<br>आ) सत्ता (**Power**), अधिसत्ता (**Sovereignty),** अधिमान्यता (**Supremacy**), वर्चस्व (**Dominance),** धुरिणत्व (**Hegemony)** व विचारसरणी (Ideology)<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका, श्रेयांकन १) |
| | **घटक २ : राजकारण आणि साहित्य : परस्पर अनुबंध** |
| | अ) विचारसरणी (Ideology) : राजकारण आणि साहित्य<br>आ) राजकारण आणि साहित्य : परस्पर अनुबंध<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका, श्रेयांकन १) |
| | **घटक ३ : निवडक साहित्यकृती : नाटक** |
| | उद्ध्वस्त धर्मशाळा : गो. पु. देशपांडे<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका, श्रेयांकन १) |
| | **घटक ४ : निवडक साहित्यकृती : कादंबरी** |
| | सभापती : योगीराज वाघमारे<br>(६० मिनिटांच्या १५ तासिका, श्रेयांकन १) |
| **10** | **पाठ्य ग्रंथ (Text Books) :**<br>१. *उद्ध्वस्त धर्मशाळा*, गो. पु. देशपांडे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७४.<br>२. *सभापती*, योगीराज वाघमारे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९५. |

<table>
<tr>
<td>11</td>
<td colspan="2">
संदर्भ ग्रंथ (Reference Books) :<br>
मराठी :<br>
१. झोत, रावसाहेब कसबे, सुगावा प्रकाशन, पुणे, १९७८.<br>
२. बदलता महाराष्ट्र, (संपा.) भास्कर लक्ष्मण भोळे व किशोर बेडकिहाळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा, दुसरी आवृत्ती - २००३.<br>
३. महाराष्ट्रातील गांधीवादाचा विकास आणि अन्वयार्थ, अशोक चौसाळकर, महात्मा गांधी अभ्यास केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २००३.<br>
४. आंबेडकरी चळवळ, य. दि. फडके, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, २००७.<br>
५. यशवंतराव चव्हाण : राजकारण आणि साहित्य, भास्कर लक्ष्मण भोळे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, तिसरी आवृत्ती - २००७.<br>
६. राजकीय सिद्धांत आणि विश्लेषण, भास्कर लक्ष्मण भोळे, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, २०१०.<br>
७. मराठी साहित्य आणि प्रभुत्वाचे राजकारण, (संपा.) कमलेश बेडसे, हरिती पब्लिकेशन्स, पुणे, २००७.<br>
८. राजनीतिशास्त्र परिचय (ॲन इंट्रडक्शन टू पोलिटिकल थिअरी), ओ.पी. गाबा, (अनु.) तुकाराम जाधव, के. सागर पब्लिकेशन्स्, पुणे, २०११.<br>
९. सांस्कृतिक महाराष्ट्र : भाग एक (१९६० ते २०१०), (संपा.) मधु मंगेश कर्णिक, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २०११.<br>
English :<br>
1. Marxism and the Reality of Power 1919 -1980, Olga A. Narkiewicz, Croom Helm Ltd, London, 1981.<br>
2. The New Communism, Peter Pryer, Arthur H.Stockwell Ltd, London, 1986.
</td>
</tr>
<tr>
<td>12</td>
<td>Internal Continuous Assessment: 40%</td>
<td>External, Semester End Examination : 60%<br>Individual Passing in Internal and External Examination</td>
</tr>
<tr>
<td>13.</td>
<td>
अंतर्गत सातत्यपूर्ण मूल्यांकन (Internal Continuous Assessment) : ४० गुण<br>
अंतर्गत मूल्यांकनाचे स्वरूप (Format of Internal Assessment) :<br>
चाचणी परीक्षा / मौखिक परीक्षा / प्रकल्पलेखन / नियतकार्य (Assignment) / सादरीकरण / प्रश्नमंजूषा यांपैकी कोणत्याही पद्धतींचा अवलंब करून अंतर्गत मूल्यमापन करता येईल.<br>
(प्रत्यक्ष उपस्थिती किंवा ऑनलाईन)
</td>
<td>
बहिर्गत परीक्षा (External Examination) : ६० गुण (वेळ : दोन तास)<br>
बहिर्गत परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप (Format of Question Paper) :<br>
५. प्रत्येकी १५ गुणांचे सहा प्रश्न विचारावेत. विद्यार्थ्यांनी चार प्रश्नांची उत्तरे लिहावीत. पहिल्या पाच प्रश्नांपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे लिहिणे आवश्यक आहे. सहावा प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.<br>
६. पहिले चार प्रश्न हे प्रत्येक घटकावर आधारलेले दीर्घोत्तरी स्वरूपाचे व अंतर्गत पर्याय देणारे असावेत.<br>
७. प्रश्न क्रमांक पाच हा सर्व घटकांवर आधारित टिपांचा असावा. चारपैकी कोणत्याही दोन टिपा लिहाव्यात.<br>
८. प्रश्न क्रमांक सहा हा अनिवार्य असून तो सर्व घटकांवर आधारित वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असावा. या प्रश्नामध्ये प्रत्येक घटकावर पाच प्रश्न विचारावेत. विद्यार्थ्यांनी एकूण वीस वस्तुनिष्ठ प्रश्नांपैकी कोणत्याही पंधरा प्रश्नांची उत्तरे लिहावीत.
</td>
</tr>
</table>

# QUESTION PAPER PATTERN

## बहिर्गत परीक्षा ६० - गुण, वेळ दोन तास

१. प्रत्येकी १५ गुणांचे **सहा** प्रश्न विचारावेत. विद्यार्थ्यांनी **चार** प्रश्नांची उत्तरे लिहावीत. पहिल्या **पाच प्रश्नांपैकी कोणत्याही तीन** प्रश्नांची उत्तरे लिहिणे आवश्यक आहे. **सहावा** प्रश्न सोडविणे **अनिवार्य** आहे.

२. पहिले **चार** प्रश्न हे प्रत्येक घटकावर आधारलेले दीर्घोत्तरी स्वरूपाचे व अंतर्गत पर्याय देणारे असावेत.

३. प्रश्न क्रमांक **पाच** हा सर्व घटकांवर आधारित टिपांचा असावा. **चार**पैकी कोणत्याही **दोन** टिपा लिहाव्यात.

४. प्रश्न क्रमांक **सहा** हा **अनिवार्य** असून तो सर्व घटकांवर आधारित वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असावा. या प्रश्नामध्ये प्रत्येक घटकावर **पाच** प्रश्न विचारावेत. विद्यार्थ्यांनी एकूण **वीस** वस्तुनिष्ठ प्रश्नांपैकी कोणत्याही **पंधरा** प्रश्नांची उत्तरे लिहावीत.

| Sd/- | Sd/- | Sd/- | Sd/- |
|---|---|---|---|
| **Sign of the BOS Chairman,<br>Dr. Satish Kamat,<br>Board of Studies in Marathi** | **Sign of the Offg. Associate Dean,<br>Dr. Suchitra Naik<br>Faculty of Humanities** | **Sign of the Offg. Associate Dean,<br>Dr. Manisha Karne<br>Faculty of Humanities** | **Sign of the Offg. Dean,<br>Prof. Dr. Anil Singh<br>Faculty of Humanities** |